Review Of Research
Vol. 4 | Issue. 6 | March. 2015
Impact Factor : 3.1402 (UIF)
ISSN:-2249-894X
Available online at www.lbp.world

ORIGINAL ARTICLE

# संत परंपरा आणि कृषि संस्कृतीच्या निर्मितीला आ. ह. साळुंखे यांचा स्पर्श

डॉ. वामन जाधव
मराठी विभाग , सहयोगी प्राध्यापक ,
मा. ह. महाडिक महाविद्यालय मोडनिंब.

प्रस्तावना :

डॉ. आ. ह. साळुंखे यांचे विद्रोही तुकाराम हे खूप महत्त्वाचे पुस्तक आहे. महत्त्वाचे यासाठीच की, या पुस्तकाने महाराष्ट्रातील संत तुकाराम या खूप महान अशा जीवनश्रद्धेकडे आणि विचारश्रद्धेकडे पाहण्याचा दृष्टिकोण बदलला. तोपर्यंत सरळधोपट मार्गाने पाहण्याची आणि विचार करण्याची प्रक्रिया चालू होती. मधल्या खूप मोठ्या चारशे वर्षांच्या कालखंडात या संताकडे वेगळ्या दृष्टीने पाहण्याचा साधा विचारही कुणी केलेला नव्हता. तो प्रथमतः डॉ. साळुंखे यांनी केला आणि महाराष्ट्राच्या मनात पेरला. तो यशस्वीपणे रूजला. विद्रोही तुकाराम महाराष्ट्राच्या मनात नव्याने उभा राहिला. तो तुकाराम इथल्या मराठी माणसांची खरी वैचारिक भूमी होती आणि भूमिकाही होती. मला वाटते, विद्रोही तुकाराम हे पुस्तक खऱ्या अर्थाने आणखी जास्त लोकांपर्यंत पोचायला हवे. ते आम्ही पोचवायला हवे. सुरूवातीच्या काळात माझे मार्गदर्शक सांगोल्याचे डॉ. कृष्णा इंगोले विद्रोही तुकाराम या पुस्तकाबद्दल भरभरून बोलत होते. त्याच दरम्यान एकदा फोनवर बोलताना ते म्हणाले, श्रीपूरला ग्रामीण साहित्य संमेलन आहे. आ. ह. साळुंखे तिथे येणार आहेत. आपण त्यांची भेट घेऊ. इंगोले सरांनी फोन ठेवला.

विद्रोही तुकाराम या ग्रंथाविषयी माझी उत्सुकता वाढली. केव्हा एकदा पुस्तक वाचून काढतोय असे झाले होते. त्यातच आ. ह. साळुंखे सरांना प्रत्यक्ष भेटता येणार होते, त्याचाही आनंद होताच. डॉ. इंगोले खाजगी वाहनाने पंढरपूरला आले आणि आम्ही श्रीपूरला निघालो. श्रीपूरला पोचेपर्यंत विद्रोही तुकाराम या ग्रंथाची चर्चा होती. आम्ही ग्रामीण साहित्य संमेलनाच्या मंडपात आलो. परिसंवादाला सुरूवात झाली नव्हती. डॉ. साळुंखे सर मंडपात बसले होते. इंगोले सरांचा आणि त्यांचा पूर्वीचा स्नेह होता, चांगली ओळख होती. सरांनी नमस्कार केला. स्वाभाविकच साहित्य चर्चेला सुरूवात झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची विद्वत्ता, छत्रपती शाहू महाराज यांची समता, महात्मा फुले यांचा पुरोगामीपणा, संत तुकाराम यांचा परखडपणा, संत नामदेवांची भावनिकता, संत चोखामेळ्यांची व्याकुळता, कर्ममेळ्यांचा विद्रोह, संत सावता माळ्यांची श्रमप्रतिष्ठा, हे गुण जिथे गुण्यागोविंदाने नांदतात, अशा प्रतिभावंताच्या समवेत आम्ही चर्चा करत होतो. माहीत नसलेले संत साहित्यातील अनेक संदर्भ ऐकायला मिळत होते. आपण संत साहित्याच्या विद्यापीठात आहोत, असे वाटत होते.

साहित्य संमेलनाच्या ठिकाणी डॉ. साळुंखे सरांचे नाव पुकारले आणि परिसंवादासाठी सर स्टेजवर गेले. बहुजन समाजाविषयी, त्याच्या प्रगतीविषयी सर आंतरिक तळमळीने बोलत होते. येणारा काळ खूप कठीण आहे. बहुजनांनी जागृत असायला हवे. त्यांच्या धडावर त्यांचेच डोके असायला हवे, मन, मेंदू आणि मनगट गुलाम होऊ देऊ नका, शिक्षणाशिवाय पर्याय नाही, तरूण पिढीसमोर खूप मोठी आव्हाने आहेत, ती आव्हाने पेलण्यासाठी खूप वाचले पाहिजे. क्षणिक मोहाला बळी पडू नका, व्यसनी होऊ नका, सर खूप तळमळीने बोलत होते. अधून मधून उदाहरणे देत होते. परिसंवाद संपला. आम्ही परतीच्या प्रवासासाठी निघालो. डॉ. इंगोले सरांनी आणखी एक आनंदाची बातमी सांगितली. डॉ. साळुंखे सर आपल्यासोबत पंढरपूरला येणार आहेत. शिवाय, त्यांची गाडीही आहे. त्यांच्या समवेत जाऊ. कार्यक्रमाच्या संयोजकांनी डॉ. साळुंखे यांच्यासाठी जीप दिली होती. त्यांच्यासोबत त्यांचे आणखी दोन मित्रही होते.

ड्रायव्हरशेजारी डॉ. इंगोले सर बसले, डॉ. साळुंखे सरांना थकवा आला होता. अंगात थोडा तापही होता. थंडीचे दिवस होते. श्रीपूरचा परिसर तसा बागायती असल्याने थंडी अधिक जाणवत होती. डॉ. इंगोले साळुंखे सरांना म्हणाले, तुम्ही मधल्या सीटवर बसा, म्हणजे थंडी लागणार नाही. गार वारे लागू नये म्हणून डॉ. साळुंखे सरांना मध्ये बसवले होते. त्यांच्या एका बाजूला मी व दुसऱ्या बाजूला त्यांचे एक सहकारी मित्र बसले होते. गाडी सुरू झाली. साहित्य चर्चेला सुरूवात झाली. पण साहित्यिक चर्चा फिरून संत तुकाराम यांच्यावरच येत होती. विद्रोही तुकारामाजवळ येऊन थांबत होती. श्रीपूर सोडून गाडी बरीच लांब आली होती. साळुंखे सर म्हणाले, इंगोले सर, मी जरा विश्रांती घेतो.

इंगोले सर म्हणाले, वामनच्या मांडीवर झोपा. त्यावर साळुंखे सर म्हणाले, बाप रे, वामनाच्या मांडीवर मी कसा झोपू? सरांच्या या बोलण्यावर सर्वजण खळखळून हसले. मग इंगोले सर सांगू लागले, अहो, तो बळीला पाताळात घातलेला वामन नव्हे. तो आधुनिक युगातला वामन आहे. तो शेतकरी जीवनावर संशोधन करतोय. त्यावरच तो पीएच. डी. करतोय.

हे ऐकून डॉ. साळुंखे म्हणाले, अरे वा, मनापासून अभिनंदन. शेतकरी जीवनावर संशोधन होतंय, ही बाब खूपच कौतुकास्पद आहे. अरे, तुझा विषय कसा आहे? मी म्हणालो ग्रामीण साहित्यातील शेतकरी जीवन, ग्रामीण साहित्यात शेतकरी जीवनावर समाधानकारक लेखन झाले नाही. इंगोले सरांनी विषयाला सुरूवात करून दिली होती. महात्मा फुले यांच्या साहित्यात शेतकरी जीवनाचे चित्रण आले आहे. महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांच्या दयनीय अवस्थेचे केवळ चित्रण केले नाही, तर त्याच्या या अवस्थेची कारणे सांगितली व त्यावर उपायही सुचविला. एवढ्या गंभीरपणे ग्रामीण साहित्यात शेतकरी जीवनावर लेखन झाले नाही. अलिकडच्या काळात भास्कर चंदनशिव, आसाराम लोमटे यांच्या साहित्यात शेतकरी जीवनाचे लेखन आले आहे. शेतकऱ्याची ही चर्चा पुन्हा संत साहित्याकडे आली. संत तुकारामांच्या साहित्यात शेतकरी जीवनाचे वास्तव चित्रण आहे, असे डॉ. साळुंखे म्हणाले. ते पुढे सांगू लागले, संत तुकाराम हे स्वतः शेतकरी असल्यामुळे शेतीविषयी अभंग लिहिताना त्या अभंगामध्ये जिवंतपणा आलेला आहे. विद्रोही तुकारामामध्ये मी ते विस्तारभयास्तव फार लिहिले नाही. परंतु 'तुकारामांचा शेतकरी' या पुस्तकात स्वतंत्रपणे मांडले आहे.

मी सहज म्हणालो, संत सावता माळी यांच्या काव्यातही शेती–शेतकरी, त्यांच्या श्रमाचे काव्य आले आहे. त्यावर साळुंखे सर म्हणाले, हे सर्व संत ग्रामीण जीवनाशी निगडित होते. त्यांच्या काव्यात ग्रामजीवनाचे संदर्भ येणे स्वाभाविक आहे. शिवाय, महानुभाव पंथाच्या साहित्यातही शेती व शेतकरी यांविषयी संदर्भ आहेत. खरे तर यावर खूप काम करण्यासारखे आहे. नव्या मुलांनी यावर संशोधन करायला हवे. संतांच्या काव्यातील शेतकरी जीवन हा विषय साळुंखे सरांनी सुचवला होता. त्यावर चर्चाही खूप झाली होती. सर माझ्या मांडीवर झोपूनच बोलत होते, परिसंवादात भाग घेतला होता. त्यासाठी साताऱ्याहून सकाळी प्रवास करून आले होते. त्या परिसंवादानंतर आम्ही रात्रीचा प्रवास करत होतो. सरांच्या अंगात ताप होता. थंडीने कुडकुडत होते. परंतु

विचारांना विराम नव्हता. ही माणसे किती काम करतात, कसं काम करतात, हे मी जवळून अनुभवत होतो. या अशा रात्रीच्या प्रवासातही साहित्याचा जागर सुरूच होता. त्या जागरात मला अजून कुठेतरी जाग येत होती.

साहित्यात काम करण्यासारखे खूप आहे. आपण भरपूर वाचले पाहिजे. आपले वाचन खूप कमी आहे, याची जाणीव मला झाली होती. मी पंढरपूरमध्ये उतरलो. इंगोले सर आणि डॉ. साळुंखे सर पुढे सांगोल्याला गेले. मी मात्र रात्रभर अस्वस्थ होतो. शेतकरी जीवनावरील संशोधन करणे ही आपल्यावर खूप मोठी जबाबदारी आहे. केवळ ग्रामीण साहित्यातच नव्हे, तर संत साहित्यातही शेतकरी जीवन आहे. ते शोधायला हवे. डॉ. साळुंखे सरांचा प्रत्येक शब्द मी आठवत होतो. त्यानंतर बराच काळ गेला. डॉ. स्नेहल तावरे यांनी मॉरिशसला संत साहित्यावर चर्चासत्र घेतले होते. मी चर्चासत्रासाठी जाण्याचे ठरविले आणि संत सावता माळी यांच्यावर शोधनिबंध वाचण्याचे ठरविले. मी झपाटून कामाला लागलो. संत सावता माळी यांच्यावरील ग्रंथ गोळा केले. प्रत्येक ग्रंथ वाचताना डॉ. साळुंखे सरांची आठवण होत होती. सर म्हणाले होते, अरे संशोधनाचे काम बहुजनांच्या मुलांनीच करायला हवे. आपल्यासाठी संतांनी खूप काही लिहून ठेवले आहे. आपण त्याकडे डोळसपणे पाहायला हवे. सरांचे हे बोलणे आठवल्यावर मी पुनः पुन्हा संत सावता माळी यांचे साहित्य वाचत होतो. काही हाताला लागत होते. काही निसटून जात होते. कंटाळा येत होता, पण डॉ. साळुंखे सरांचे बोलही आठवत होते. त्यामुळे नवा उत्साह येत होता.

डॉ. साळुंखे यांचे विद्रोही तुकाराम हे पुस्तक झपाटून वाचले. शेतकऱ्यांच्या जीवनाची आणि कृषिजाणिवांची परखड आणि तितकीच जागरूक भूमिका संत तुकारामांच्या अभंगातून व्यक्त होते. अशा निवडक अभंगांचे डॉ. साळुंखे यांचे 'तुकारामांचा शेतकरी' हे पुस्तकही मिळविले आणि वाचले. एक भारावलेपण त्या अभंगाच्या शब्दाशब्दांत भरलेले जाणवले. या दृष्टीने आपण किती विचार करायला हवा, हे जाणवले. तुकारामांचा शेतकरी आणि तुकारामांची शेती व शेतकरी यांच्याविषयी जो विचार केलेला आहे ते लक्षात घेतले. पुस्तकाच्या पाठीमागच्या पृष्ठावरच संत तुकारामांची शेतीविषयक अभंगवचने आहेत,

मिरासीचे म्हणू शेत, नाही देत पीक उगे
खोल ओली पडे, ते पीक उत्तम
गोमट्या बीजाची फळेही गोमटी
जीवनेंविण पीक नव्हे नव्हे जाण
ओले मूळ भेदी खडकाचे अंग
न काढिता तण, कैंचे येति कण हातासी ते?
झाडेझुडे जीव सोईरे पाषाण
शेत ओले सुगी, सांभाळावे चारी कोण
पिकविले तया खाणे किती?
घरी मोडकिया बाजा, वरी वाकळांचा शेजा

अशी संत तुकारामांची अभंगवचने आहेत आणि यावर डॉ. साळुंखे यांनी विस्ताराने विचार व्यक्त केले आहेत. तुकारामांच्या शेतकरी या पुस्तकामध्ये डॉ. साळुंखे म्हणतात, ''तुकारामांच्या अभंगामध्ये शेतीचे जे संदर्भ आले आहेत, ते प्रामुख्याने दोन प्रकारचे आहेत. काही वेळा प्रत्यक्षरीत्या शेतीशी संबंधित अशा एखाद्या घटकाचे वर्णन करण्यासाठीच त्यांनी रचना केल्याचे आढळते. परंतु त्या अपवादात्मकच म्हणाव्या लागतील. केवळ शेतकऱ्यांसाठी म्हणूनच नव्हे तर सर्व समाजासाठीच जीवनाचे काही व्यापक तत्त्वज्ञान सांगताना उपमान म्हणून शेतीशी संबंधीत घटकांचे वर्णन करणे हा प्रकार मात्र त्यांच्या अभंगात वारंवार आढळतो. उपमा, उत्प्रेक्षा, रूपक, अतिशयोक्ती, व्यतिरेक, दृष्टांत, अर्थांतरन्यास इत्यादी अलंकारांची रचना करताना त्यांनी अशा प्रकारची उपमाने पुन्हा पुन्हा वापरली आहेत. शेतकऱ्यांच्या जीवनातील विविध घटना व प्रसंग हा त्यांच्या दैनंदिन

अनुभवांचा भाग असल्याने त्यांनी दिलेले शेतीचे दाखले सर्व उत्स्फूर्त आहेत. आणि त्यामुळेच हे प्रत्ययकारीही बनले आहेत. खास शेतीच्या क्षेत्रात आढळणारे शब्द वा संकल्पना यांचा इतर क्षेत्राशी वर्णने करण्यासाठी केलेला सूचक प्रयोग हा आणखी एक प्रकारही या अभंगातून आढळतो. (तुकारामांचा शेतकरी, पृ. १२) हे सगळे अभ्यासल्यावर नव्या जागृतीचे जग पाहिल्याचा अनुभव आला.

मॉरिशसच्या चर्चासत्रात माझा शोधनिबंध छान झाला. मलाही खूप समाधान वाटले. एका एका संतांचा अभ्यास करत गेलो. प्रत्येक संताच्या काव्यात शेती संस्कृतीचे चित्रण वाचत होतो. त्यातच एके दिवशी ॲग्रोवनचे आदिनाथ चव्हाण यांची भेट डॉ. द. ता. भोसले यांनी करून दिली. त्यांच्या पुण्याच्या ऑफिसमध्ये चर्चा झाली आणि आम्ही ऑफिसच्या बाहेर आलो. आदिनाथ चव्हाण डॉ. भोसले यांना म्हणाले, 'अहो सर, हा मुलगा खूप हुशार आहे. ग्रामसंस्कृतीची याला उत्तम जाण आहे. त्याचे चिंतन चांगले आहे.' डॉ. भोसले विजय सुकळीकर यांच्याबरोबर आत बोलत बसले होते. शिपायाने सांगितले, तुम्हाला साहेबांनी आत बोलावले आहे. डॉ. भोसले सर म्हणाले, 'अरे वामन, साहेब काय म्हणतात ते बघ.' आदिनाथ चव्हाण म्हणाले, तुम्ही जे मघाशी बोलत होता, ते सगळे लिहून काढा आणि मला द्या. तुम्ही मघाशी सावता माळी यांच्याविषयी खूप छान बोलत होता. मी हो म्हणालो. भोसले सर लेख कसा लिहावा याविषयी सांगत होते. परंतु लेख चांगला होईल का? असा विचार माझ्या मनात येत होता. लेख लिहिला आणि दै. ॲग्रोवनला दिला. दुसऱ्या आठवड्यात हा लेख संपादकीय पृष्ठावर छापून आला होता. लेख खूप छान झाला आहे, असे सांगणारे खूप फोन महाराष्ट्रातून आले. ना. धो. महानोर, श्रीकांत देशमुख, रणधीर शिंदे, विठ्ठल वाघ अशा अनेक मान्यवरांचे फोन आले. आपल्या हातून काही तरी चांगले लिहून झाले आहे, असे वाटू लागले. त्यातच गाडगेबाबा, चोखामेळा, नामदेव, गोरा कुंभार, यांच्यावरचे लेख प्रसिद्ध झाले होते. सिद्धार्थ ढवळे, नवनाथ पोरे, अभय जोशी, शिवाजी शिंदे या संपादकांनी लेखनास प्रसिद्धी दिली होती. विजय सुकळीकर यांनी सलग चार लेख दै. ॲग्रोवनमधून छापले होते. या सर्व लेखांचे पुस्तक व्हायला हवे, असा आग्रह डॉ. राजशेखर शिंदे यांनी धरला. विठ्ठलावरचा लेख त्यांनी माझ्याकडून लिहून घेतला. 'संतपरंपरा आणि कृषिसंस्कृती' पुस्तक आकारास आले. श्रीकांत देशमुख यांनी या पुस्तकास प्रस्तावना दिली आणि हर्मिस प्रकाशनकडे छापण्यासही त्यांनीच दिले. पुस्तक चांगले झाले. त्याची प्रत हातात पडताच मला डॉ. आ. ह. साळुंखे यांची आठवण झाली. त्यांनी सांगितलेला रस्ता आपण तुडवत आलो. त्या प्रवासातले हे पहिले यश. सरांच्या सहवासातील काही क्षणांनी मला ग्रंथनिर्मितीची आणि या विषयावर लिहिण्याची प्रेरणा मिळाली. त्यांचा एवढा स्पर्शही माझ्यामध्ये अनंत प्रेरणा ठेवून गेला. त्यांचे आत्मीयतेने सांगणे, प्रवासातील सहवास आणि सहवासातील विचारांनी मी प्रभावित झालो. लिहिता झालो. त्यांना आठवतच माझ्यातला विचार जिवंत राहू शकला. अथक प्रवास आणि त्या प्रवासातही विचारांची देवाणघेवाण करणारा हा विचारवंत श्वासागणिक ज्ञानाच्या गोष्टीचे चिंतनच करत राहतो. तो स्पर्शमाझ्या आयुष्याला झाला, हीच माझ्या आयुष्याची कृतार्थता.

## संदर्भ

1.ग्रामीण साहित्य आणि शेतकरी जीवन सुविद्या प्रकाशन, सोलापूर.
2. जाधव रा. ग. – मराठीतील कथारूपे – स्नेहवर्दन पब्लिशिंग हाऊस पुणे, प्रथमावृत्ती 9 नोव्हेंबर 1999.